**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५४ वा ● बुधवार १० जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 54 | Date : 10/07/2024 blow Wednesday Page 4 Price 4


## शेगावचा राणा सोलापूर जिल्ह्यात दाखल; भक्तिमय वातावरणात स्वागत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : ऊन-वारा-पाऊस अंगावर झेलत आणि वाटेत गावोगावी हजारो भाविकांचे स्वागत, सेवा स्वीकारत मजल दरमजल करीत निघालेल्या श्रीक्षेत्र शेगावच्या संत गजानन महाराज संस्थानाचा पालखी सोहळा मंगळवारी सायंकाळी सोलापूर जिल्ह्यात दाखल झाला. पंढरीच्या राणाला भेटण्यासाठी आतूर झालेला शेगावचा राणा तुळजापूरमार्गे सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर पोहोचताच त्याचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. रात्री उळे गावात मुक्काम करून उद्या बुधवारी हा पालखी सोहळा सोलापूर शहरात दाखल होणार आहे.


पंढरपूरच्या आषाढी यात्रेसाठी महाराष्ट्राचे आराध्यदैवत विठ्ठल दर्शनाची आस घेऊन लाखो वारक-





यांच्या दळभारासह अनेक संतांच्या पालखी सोहळे, दिंड्या पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. त्यापैकी शेगावच्या संत श्री गजानन महाराज संस्थानाच्या पालखी सोहळ्याचे महत्व वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते. गेल्या १३ जून रोजी शेगाव येथून प्रस्थान ठेवलेला हा पालखी सोहळा सुमारे ७५० किलोमीटर पायी चालत पंढरपूरला जाणार आहे. धाराशिव, तुळजापूरमार्गे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी तामलवाडी येथे धाराशिव जिल्हा प्रशासनाने पालखी सोहळ्याला निरोप दिला आणि नंतर सोलापूर जिल्ह्यात पाऊल ठेवताच सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे आणि अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर यांनी प्रशासनाच्यावतीने शेगावचा राणा भक्तिमय वातावरणात स्वागत केले. माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनीही पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. रात्री पालखी सोहाळ उळे गावी विसावला.

आज बुधवारी सकाळी संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा ' गण गण गणात बोते 'चा उद्घोष आणि टाळमृदुंगाचा गजर करीत हा पालखी सोहळा शहरात रूपाभवानी मंदिराजवळील पाणी गिरणी चौकात पोहोचल्यानंतर तेथे स्वागत होणार आहे. शहरात दोन दिवस मुक्काम करून तिस-या दिवशी शेगावचा राणा । पान २ वर




## हिंगोली जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

हिंगोली : जिल्ह्यात आज (१० जुलै) सकाळी ६ वाजताच्या सुमारास ४.५ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसल्याची माहिती समोर आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील भूकंपाचे हादरे हे नांदेड आणि परभणी जिल्ह्यात काही ठिकाणी जाणवले असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, राष्ट्रीय भुकंपशास्त्र केंद्राकडूनही यासंदर्भातील माहिती देण्यात आली आहे. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे कोणतीही जीवितहानी झालेली नाही. फक्त हिंगोली जिल्ह्यातील काही भागात भूकंपाचे सौम्य दोन धक्के जाणवले आहेत, अशी माहिती स्थानिक सांगत आहेत. हिंगोली जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्यानंतर काही व्हिडीओ व्हायरल होत आहेत. यामध्ये एक व्हिडीओ समोर आला असून त्यामध्ये एका घरातील । पान २ वर

## रशियाकडून सर्वोच्च पुरस्काराने सन्मान



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी यांना रशियातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपॉस्टल' असे या पुरस्काराचे नाव असून हा रशियातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी या पुरस्काराने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सन्मान केला आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, रशियाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने मला सन्मानित केल्याबद्दल रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन याचे आभार मानतो. तसेच हा पुरस्कार मी भारतीयांना समर्पित करतो. हा सन्मान फक्त माझा नाही तर हा १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. भारत आणि रशिया यांच्यातील शतकानुशतके मैत्रीचा आणि परस्पर विश्र्वासाचा हा सन्मान आहे. प्रत्येक । पान २ वर

## उत्तर प्रदेशात भीषण अपघात; दुधाच्या कंटेनरला बसची धडक, १८ प्रवाशांचा मृत्यू!




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उत्तर प्रदेशच्या बेहता मुजावर परिसरात आज पहाटे झालेल्या भीषण अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. एक स्लीपर बस एका दुधाच्या कंटेनरला मागून धडकल्यामुळे हा अपघात झाला. बिहारच्या शिवगढहून दिल्लीच्या दिशेने ही बस जात होती. लखनौ-आगरा महामार्गावर बेहता मुजावर परिसरात समोर उभ्या दुधाच्या कंटेनरला बस मागून जोरात धडकली. हा अपघात इतका भीषण होता की यात बस आणि कंटेनरचाही अक्षरश: चुराडा झाला. अपघातात मृत झालेल्या व्यक्तींमध्ये दोन महिला व एका लहानग्याचा समावेश आहे. याशिवाय २० जण गंभीर जखमी झाल्याचीही प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यामुळे मृतांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त बस डबलडेकर प्रवासी वाहन असल्यामुळे त्यात मोठ्या संख्येनं प्रवासी प्रवास करत होतं. दिल्लीच्या दिशेने जाणाऱ्या या बसची पहाटे ५ वाजून १५ मिनिटांनी आग्रा-लखनौ महामार्गावर एका दुधाच्या कंटेनरशी धडक झाली. हा कंटेनर महामार्गाच्या कडेला उभा असताना बसनं मागच्या बाजूने कंटेनरला जोरात धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचा चुराडा झाला. अपघाताची । पान २ वर

## गौतम गंभीरची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली: भारतीय क्रिकेट संघाने नुकतीच टी-२० विश्वचषकात विजय मिळविल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर बीसीसीआय मुख्य प्रशिक्षकपदाच्या शोधात होती. भारताचा माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर या पदासाठी इच्छुक होता. त्यासाठी त्याने मुलाखतही दिली होती. आता बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी गौतम गंभीरची मुख्य



प्रशिक्षकपदी निवड झाल्याचे जाहीर केले आहे. गौतम गंभीरचा कार्यकाळ जुलै २०२४ पासून सुरू होत आहे. तो डिसेंबर २०२७ पर्यंत या पदावर राहिल. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांकरिता प्रशिक्षकपदाची जबाबदारी त्याच्यावर राहणार आहे.

जय शाह यांनी एक्सवर पोस्ट करत ही बातमी दिली आहे. त्यात ते म्हणाले, भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षकपदासाठी माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांचे नाव जाहीर करताना मला आत्यंतिक आनंद होत आहे. आधुनिक काळातील क्रिकेट झपाट्याने बदलले आहे आणि गौतम या बदलांचा साक्षीदार राहिला आहे. गौतमने त्याच्या कारकिर्दीत अनेक भूमिका वठविल्या आहेत. त्याने आजवर केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तो यापुढे भारतीय संघालाही पुढे नेईल. तसेच हे करण्यासाठी तो आदर्श व्यक्ती वाटतो. गौतम गंभीरची दूरदृष्टी आणि त्याचा अफाट अनुभव त्याला मुख्य प्रशिक्षकपदासाठी योग्य दावेदार ठरवतो. बीसीसीआयकडून गौतम गंभीरच्या या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा, अशा शब्दांत जय शाह यांनी गौतम गंभीरचे स्वागत केले आहे.। पान २ वर

## राजकीय पक्षांनी आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी : मुख्यमंत्री

### आरक्षण मुद्द्यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली सर्वपक्षीय बैठक



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधीत राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होवू देणार नाही, अशी ग्वाही देऊन आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका, अभिप्राय शासनाला कळवावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आरक्षणाबाबत सर्वपक्षीय बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र । पान २ वर

## बार्टीच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सप्ताह निमित्त वृक्षारोपण



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रम शाळा हंजगी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी अक्कलकोट तालुका समतादुत नालंदा चंदनशिवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन सामाजिक न्याय विभागाच्या सर्व योजनांची माहिती देऊन जयंती सप्ताह साजरी करण्यात आली सदर कार्यक्रमास सह.शिक्षक मल्लिनाथ होसुरे,सिध्दगोंडा बिराजदार, राजशेखर चांगले, वस्तीगृह अधिक्षक मोहन कुलकर्णी,श्रीधर व्हनचंगे, महिला अधिक्षक सरोजा व्हनचंगे,व शिक्षकेतर कर्मचारी भोजराज बनसोडे, विजयकुमार कलाल, चिदानंद हडपद व विद्यार्थी उपस्थित होते

## भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना

### भाविकांनी १८००-२३३-१२४० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा :अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून, भाविकांना अडचण आल्यास १८०००-२३३-१२४० या टोल फ्री क्रमांकावर तसेच ०२१८६-२२०२४० व २९९२४३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन अपर जिल्हाधिकारी तथा इन्सिंडट कमांडर मोनिका सिंग ठाकूर यांनी केले आहे.आषाढी वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, नगरपालिका, तहसिल कार्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र प्रांत कार्यालय पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. आरोग्य विभागामार्फत यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर येथे प्रथमोपचार केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करण्यात आला आहे. सर्व सुविधायुक्त रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून दर्शन रांग, पत्राशेड, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर व मंदीर परिसर येथे वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे. ६५ एकर परिसरात मुबलक प्रमाणात पाणी व्यवस्था, अखंडीत व सुरक्षित विद्युत पुरवठा, अग्निशमन व्यवस्थेसह फिरते आरोग्य पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.नदीपात्रात स्वच्छता व पुरेसा प्रकाश राहिल याची दक्षता घेण्यात आली आहे. डास प्रतिबंधासाठी औषधाची फवारणी, शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी, वाहतुकीस कोणतेही अडचण येवू नये यासाठी शहराबाहेर मोकळया जागेवर वाहन पार्किग व्यवस्था करण्यात आली असल्याचे अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी सांगितले.

## भाविकांच्या सुविधेसाठी 'पंढरीची वारी' ॲप सुरु

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळयासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना प्रशासनाकडून सोलापूर वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती उपलब्ध होणार आहे. याशिवाय पालखी मार्गावर वारकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे.गर्दीच्या काळात मदत व्हावी, यासाठी आषाढी वारी मध्ये पंढरीची वारी नावाने मोबाईल ॲप https://play.google.com/store/apps/details?id=com.aashadhiśwari सुरु करण्यात आले आहे. या पचा लाभ भाविकांनी घ्यावा. ज्या महामार्गावरून दिंडी सोहळा येणार आहे, तो महामार्ग ते पंढरपूरपर्यंत पोहोचेपर्यंत ॲप वारकऱ्यांना माहिती देण्यासाठी उपयुक्त ठरेल.

यामध्ये वारीचे मुक्काम ठिकाण, पोलिस स्टेशन, मंदिर, पाण्याचा टँकर, हॉस्पिटल, वाहनतळ, शाळा, शौचालय, जवळपासची शासकीय कार्यालये आदी ठिकाणांची माहिती ॲपव्दारे होणार आहे.

## संपादकीय

### लक्षात घ्यावे लागणार आहे...

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सत्ताधारी भाजप आघाडीला न मिळालेल्या अपेक्षित यशाची कारणमीमांसा करताना विरोधी पक्षांनी सेट केलेल्या एका नॅरेटिव्हचा विषय नेहमी समोर आणला जातो. 'भाजप आघाडीला घटना बदलायची आहे' अशा प्रकारचे नॅरेटिव्ह या लोकसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये विरोधी पक्षांनी सेट केल्याचा तोटा सत्ताधारी भाजपला झाला, असा निष्कर्ष सर्वच राजकीय तज्ज्ञांनी काढला आहे. यानिमित्ताने राजकारणामध्ये नॅरेटिव्ह सेट करण्याच्या एका प्रक्रियेचा उदय झाला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी याच नॅरेटिव्ह प्रक्रियेचा उल्लेख करून अशा प्रकारच्या खोट्या बाबी पसरवण्यावर काही निर्बंध घालता येतात का, हे पाहण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत दिले होते. अर्थात, गेल्या काही वर्षांमध्ये ज्या प्रकारे भारतीय समाजमन संपूर्णपणे सोशल मीडियाच्या आहारी गेले आहे ते पाहता कोणत्याही प्रकारचे नॅरेटिव्ह सेट झाल्यावर किंवा ते सेट होण्यापूर्वी त्यावर कोणतेही नियंत्रण ठेवणे शक्य होईल असे वाटत नाही. अर्थात, नॅरेटिव्ह हा शब्द आताच जरी चर्चेत आला असला तरी अशाच प्रकारची प्रक्रिया फार पूर्वीपासून अस्तित्त्वात होती. ज्याप्रकारे आणीबाणीच्या कालावधीनंतर इंदिरा गांधी यांना सत्ता गमवावी लागली किंवा देशाच्या राजकारणात बोफोर्स प्रकरणाचा उदय झाल्यावर राजीव गांधी यांनाही सत्ता गमवावी लागली, ही उदाहरणे पाहता त्या कालावधीमध्ये विरोधी पक्षांनी अत्यंत सक्षमपणे हे विषय समोर असल्यामुळेच त्याचा फटका तत्कालीन सत्ताधाऱ्यांना बसला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा सर्वप्रथम पंतप्रधान झाले त्यावेळच्या २०१४ च्या निवडणुकीमध्ये सुद्धा पूर्वीच्या काँग्रेस सरकारच्या कालावधीतील विविध भ्रष्टाचारांची प्रकरणे समोर आणूनच एक नॅरेटिव्ह सेट करण्यात आला होता. त्याच कारणामुळे काँग्रेसला सत्ता गमवावी लागली होती. २०१९ च्या निवडणुकीमध्ये विरोधी पक्षांच्या हातात अशा प्रकारचा कोणताही मुद्दा नसल्याने कोणतेही नॅरेटिव्ह सेट होऊ शकले नाही आणि मोदी सहजपणे विजयी होऊ शकले. पण २०२४ च्या निवडणुकीमध्ये मात्र ४०० जागा जिंकण्याचा विषय समोर आणल्याने भाजपला संविधान बदलायचे आहे म्हणूनच एवढ्या जागा त्यांना हव्या आहेत हे नॅरेटिव्ह कुशलपणे सेट झाले आणि त्याचा फटका निश्चितपणे भाजपला बसला. अर्थात, या नॅरेटिव्हला चोख उत्तर देणे हातात असूनही भाजपच्या नेत्यांनी तसे उत्तर दिले नाही हे वास्तव लक्षात घ्यावे लागणार आहे.

# पांडुरंगाच्या रथाचा मानकरी : वडार समाज पंढरपूर

यंदाच्या आषाढी यात्रेचा सोहळा आनंदात साजरा होणार आहे.

ओढू पांडुरंगा रथ ! आम्ही वडार भाग्यवंत !!
पांडुरंगाचा रथ ओढण्याचा मान वडार समाजाला
आम्ही भाग्यवंत । पांडुरंगाचे वारकरी ।।
ओढू पांडुरंगाचा रथ ।। आम्ही वडार मानकरी ।।।

आषाढी, कार्तिकी या दोन प्रमुख यात्रा आणि या यात्रेसाठी येणारा भाविकांचा महापूर म्हणजे या पृथ्वीतळावरील एक अनुपम भक्ती सोहळा आहे. पांडुरंगाचे मुखीनाम घेत पांडुरंगाच्या वारीस निघालेला वारकरी घरातून पाऊल बाहेर पडताच मनाने पंढरीस पोहचलेला असतो. पांडुरंगाची सगुण साकार मुर्ती सदैव आपल्या ह्दयात व नेत्रात साठवून ठेवलेला भक्त वारीस येतो व तो केवळ देहरूपी वारी पोहोचविण्यासाठी. मनाने तो नित्य पंढरीत येत असतो. आषाढी, कार्तिकी एकादशी सोहळ्याच्या वेळी पांडुरंगाचा रथ नगर प्रदक्षिणेसाठी निघतो आणि पांडुरंगाच्या प्रदक्षिणा मार्गावर भक्तांची अलोट गर्दी होते. सावळ्या पांडुरंगाची प्रतिकात्मक मुर्ती रथात ठेवली जाते. पेशवाई काळात श्रीमंत गोविंदपंत खाजगीवाले सरकार आजच्या माहेश्र्वरी धर्मशाळेत वास्तव्यास होते पूर्वी काळीही पंढरपूर येथे आषाढी एकादशीला भाविकांची मोठी गर्दी होत असत. या रथावर बसण्याचा मान पंढरपूर येथील श्री.नातू, श्री.रानडे, श्री.भाटे या खाजगीवाले यांच्या नातेवाईकांना तसेच बारा बलुतेदार यांना आहे. तसेच



रथ ओढण्याचा मान वडार समाजाला आहे. मूळ रथ हा लाकडी असून त्याचे वजन २ टन एवढे आहे.

सन १७३७ पासून संस्थानच्या वतीने सुमारे २८७ वर्षापासून ही रथयात्रेची परंपरा सुरू करण्यात आली. अतिशय सुबक आणि आकर्षक अशा लाकडी रथात विराजमान झालेले भगवंत आपल्या क्षेत्राची नगर प्रदक्षिणा करावयास निघतात आणि त्यांचा रथ ओढण्याचा मान असतो तो पंढरीतील वडार समाजाला. सध्या श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे ७०० वर्षापुर्वीचे पुरातन लुक देण्यात आला आहे त्यात ही कारागीर म्हणून महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या वडार समाजाच्या लोकांनी काम केले आहे.

साऱ्या विश्र्वाच्या अस्तित्वाचा वडार हा कष्टकरी समाज दिवसभर काबाडकष्ट करावयाचे आणि मुखी पांडुरंगाचे नाव घेत रात्रीचे दोन घास भोजन करावयाचे या समाजाची परंपरा होती. पांडुरंगाचा महान रथ ओढण्याचा मान या कष्टकरी समाजाला मिळाला आहे. हे या समाजाच्या दृष्टीने परमभाग्याचे प्रतिक समजले जाते. महाराष्ट्रामध्ये तीन पवित्र पायरीचे दगड आहेत यामध्ये पंढरपूरामध्ये दोन पायऱ्या आहेत यात माझ्या १) श्री संत चोखामेळा यांची पायरी, २) श्री संत नामदेव महाराज यांची पायरी या दोन भक्तीच्या पायऱ्या तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सेवेची ३) हिरोजी इंदुलकर (वडार) यांची सेवेची तिसरी पायरी स्वराज्याची राजधानी रायगड येथे आहे.

दगडाला देवपण देणारे आम्ही वडार !
करतो कष्ट अन् मुखी देतो हरीचे नाम आम्ही वडार !!

छनीने मारतो दगडाला घाव तोच भाग्यवंत आम्ही वडार या उक्तीप्रमाणे आम्ही हरिचे नाम मुखामध्ये घेवून दिवसभर कष्ट करीत असतो.

काये कष्ट वाचे हरिनामा !
आम्ही भाग्यवंत आम्हा हेची काम !
आम्ही वडार भाग्यवंत !!!

या अभंगाप्रमाणे कष्टाचा प्रपंच अन् सेवेचा परमार्थ करणाऱ्या वडार समाजाला मिळाला रथ ओढण्याचा मान. आमच्या वडार समाजाचा प्रत्यक्ष परमेश्र्वराने केलेला सन्मान आहे असे आम्ही समजतो. समस्त वडार समाज पंढरपूर

जय बजरंग । जय वडार ।। दंडाम !!

**लेखक– दिपक बापू गुंजाळ**
**(पंढरपूर) मो.नं.९५६१५२१९९७**

पान १ वरुन

## हिंगोली जिल्ह्यात

भिंतीवरील फॅन हलताना दिसत आहे.

भूकंपाच्या धक्क्यांमुळे नागरिकांमध्ये काहीसे भीतीचे वातावरण निर्माण आहे. या भूकंपाचे केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात बाळापूर परिसर असल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, या भूकंपाच्या धक्क्यांमुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झालेली नाही. या भूकंपाच्या धक्क्यासंदर्भात अद्याप प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

राष्ट्रीय भुकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यातील भूकंपाची तीव्रत ही ४.५ रिश्टर स्केल एवढी होती. बुधवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. दरम्यान, या परिसरात भीतीचे वातावरण पसरली आहे. मात्र, घाबरुन न जाण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

## शेगावचा राणा सोलापूर जिल्ह्यात

मंगळवेढामार्गे पंढरपूरच्या दिशेने पाऊलवाट ठेवणार आहे.

यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी पालखीला पुष्पहार अर्पण करून पालखीचे सोलापूर जिल्ह्यात उत्साहाने स्वागत केले. यावेळी उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले, माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे, दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे, कासेगाव ग्रामपंचायतचे सरपंच यशपाल वाडकर, उळे ग्रामपंचायतच्या सरपंच श्रीमती अंबिका कोळी यांच्यासह कासेगाव परिसरातील विठ्ठल भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रशियाकडून सर्वोच्च

वेळी नवीन उंची गाठली आहे. यामुळे आपले परस्पर सहकार्य अधिक मजबूत होत आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं. दरम्यान, या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत त्यांनी विविध मुद्दे उपस्थित केले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी शांतीचा संदेश दिला. ते म्हणाले की, युद्धाच्या मैदानात अडचणींवरील उपाय सापडत नाहीत. कोणत्याही प्रकारचे प्रश्न्न सुटत नाहीत. शांततेसाठी चर्चेची खूप जास्त गरज असते. भारत हा नेहमीच शांततेच्या बाजूने उभा राहिला आहे. कारण युद्ध हा अडचणींवरील उपाय नाही. मला शांततेची अपेक्षा आहे. मी शांततेसाठी सर्व प्रकारची मदत करण्यास तयार आहे.

द्विपक्षीय चर्चेआधी मोदींनी मॉस्को येथील एका कार्यक्रमात तेथील भारतीयांशी संवाद साधला. ते म्हणाले, मी इथे येताना एकटा आलेलो नाही. मी माझ्याबरोबर काही गोष्टी घेऊन आलोय. मी माझ्याबरोबर भारतातल्या मातीचा गंध घेऊन आलोय, तुमच्यासाठी १४० कोटी भारतीयांचं प्रेम घेऊन आलोय. तिसऱ्यांदा पंतप्रधान बनल्यानंतर हा माझा परदेशातील भारतीय समुदायाशी पहिलाच संवाद आहे. हा खूप आंनददायी क्षण आहे. आज ९ जुलै असून मला तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेऊन आज बरोबर एक महिना झाला आहे. मी आज तुम्हा सर्वांसमोर ठामपणे सांगेन की, माझ्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात मी तिप्पट ताकद लावून काम करेन. आधीपेक्षा तिप्पट वेगाने काम करेन. देशाचा विकास वेगाने करण्याची मी शपथ घेतली आहे.

## उत्तर प्रदेशात भीषण अपघात;

भारत ही माझी ओळख आहे आणि देशाची सेवा करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा अभिमानाचा क्षण आहे. भलेही माझ्या डोक्यावर वेगळी टोपी असेल, पण मी आता भारतीय संघाचा पुन्हा एकदा भाग झालो, याचा आनंद वाटतोय. प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमान वाटेल, असे काम करणे, हेच यापुढेही माझे ध्येय असेल. निळ्या जर्सीतील खेळाडू १४० कोटी जनतेचे स्वप्न आपल्या खांद्यावर घेतात. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याचा मी प्रयत्न करेन, अशी भावना गौतम गंभीरने व्यक्त केली आहे.

नोव्हेंबर २०२३ मध्ये भारतीय संघाचा एकदिवसीय क्रिकेट विश्र्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाला. या पराभवानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती घेण्याची इच्छा जाहीर केली होती. मात्र कर्णधार रोहित शर्माच्या विनंतीनंतर त्यांनी टी-२० विश्र्वचषकापर्यंत प्रशिक्षक पदावर राहण्याचे मान्य केले. २९ जून रोजी बार्बाडोसच्या मैदानावर भारतीय क्रिकेट संघाने तब्बल ११ वर्षानंतर आयसीसी चषक जिंकत मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडला एक उत्तम भेट दिली.

## राजकीय पक्षांनी आरक्षणाबाबत

फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखेपाटील, छगन भुजबळ, रवींद्र चव्हाण, शंभूराज देसाई, दादाजी भुसे, अतुल सावे, धनंजय मुंडे यांच्यासह खासदार अशोक चव्हाण, सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, गोपीचंद पडळकर, बच्चू कडू, भरत गोगावले, महादेव जानकर आदी मान्यवर उपस्थित होते.आरक्षणासंदर्भात विविध राजकीय पक्ष, संघटनांची भूमिका महत्वपूर्ण असून राज्यात मराठा, ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत चर्चेतून मार्ग निघाला पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधीत राखली जातानाच जातीय सलोखा देखील कायम राहीला पाहिजे अशी भुमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे मांडली.मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तो कायद्याच्या चौकटीत टिकण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. हा निर्णय घेतल्यापासून शिक्षण, पद भरतीमध्ये मराठा समाजातील उमेदवारांना लाभ झाला आहे.

मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देतानाच अन्य समाज घटकांवर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. गॅझेटच्या तपासणीसाठी हैदराबाद येथे ११ जणांची टीम पाठविण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.आरक्षण हा राजकारणाचा विषय नाही तर त्यातून सामाजिक सलोखा अबाधीत रहावा यासाठी शासनाची प्रामाणिक भुमिका आहे. त्यादिशेने शासनाची सकारात्मक प्रक्रिया सुरू असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्यात सौहार्दपूर्ण वातावरण कायम रहाव, यासाठी सर्वपक्षीय सदस्यांना विश्र्वासत घेऊन चर्चेतून मार्ग काढण्याबाबत आजची बैठक बोलावण्यात आली होती. यापूर्वीही १ नोव्हेंबर २०२३ रोजी अशाच प्रकारे सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर मंत्री श्री. भुजबळ, श्री. मुंडे, विधानसभा उपाध्यक्ष श्री. झिरवाळ, सर्वश्री दरेकर, प्रकाश शेंडगे, अशोक चव्हाण, बच्चु कडु, सदाभाऊ खोत, प्रकाश आंबेडकर, सुरेश धस, अड. मंगेश ससाणे, कपिल पाटील, प्रशांत इंगळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## उत्तर प्रदेशात भीषण अपघात;

माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तोपर्यंत काही स्थानिक लोकांनी बसमधून जखमींना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले होते. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच बचावकार्य वेगाने सुरू केलं. जखमींना तातडीने नजीकच्या बांगरमौ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलं.काही प्रत्यक्षदर्शींच्यामते स्लीपर बसच्या चालकाचं बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला. महामार्गावर वेगाने जाणाऱ्या बसचालकाला वेगावर नियंत्रण ठेवता न आल्यामुळे बस थेट दुधाच्या कंटेनरला जाऊन धडकली.

# शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा जाहीर पाठिंबा पण समृद्धी महामार्गाप्रमाणे दर द्या



पंढरपूर/प्रतिनिधीः आज पंढरपूर तालुक्यातील कासेगाव अनवली तपकिरी शेटफळ या भागातील शेतकऱ्यांच्या वतीने शक्तिपीठ रस्ता झालाच पाहिजे या मागण्याचे निवेदन पंढरपूरचे प्रांताधिकारी इथापे साहेब यांना देण्यात आले या भागातून बागायती क्षेत्र असल्यामुळे फळ बागा असल्याने शेतकरी रस्त्याच्या अडचणीला सामोरे जात आहे सदर महामार्ग झाला तर या भागातील फळ पिके राज्यातील विविध भागांमध्ये वाहतूक करण्याची सोय होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांची क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही विकास व्हावा ही शेतकऱ्यांची इच्छा असून परंतु मोबदला देताना शेतकऱ्यांना समृद्धी महामार्ग प्रमाणे मोबदला मिळावा अशी ज्यांच्या शेतातून रस्ता जाणार आहे या शेतकऱ्याची मागणी आहे काही राजकारणी लोक विनाकारण विकास कामात अडथळा निर्माण करीत आहेत परंतु बाधित शेतकऱ्यांची मागणी वेगळीच आहे महाराष्ट्र शासनाने तातडीने या शेतकऱ्यांची बैठक घेऊन या शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करत हा रस्ता तयार केला पाहिजे अशी मागणीचे निवेदन भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर यांच्या नेतृत्वाखाली कासेगाव चे नेते विजय दादा देशमुख व शेतकरी बांधव यांच्या वतीने सुमारे ७०० शेतकऱ्यांच्या सह्याचे निवेदन आज देण्यात आले यावेळी लिंगराज होनमाने,काशिनाथ हाके जयवत देशमुख उपस्थित होते

# राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये चालू शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे प्रयत्न : हसन मुश्रीफ

मुंबई : राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यक परिषदेने ५० (एमबीबीएस) विद्यार्थी क्षमतेची परवानगी दिलेली आहे. उर्वरीत ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अर्ज राष्ट्रीय वैद्यक परिषदेमार्फत दर्शविण्यात आलेल्या त्रुटी पूर्ण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जिल्हा गडचिरोली, जालना, वाशीम, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, नाशिक, भंडारा, अंबरनाथ (जिल्हा ठाणे) आणि मुंबई (१० संस्था) येथे १०० (एमबीबीएस) विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आले होते.

त्रुटींची पूर्तता करण्याची कार्यवाही शासन व संचालनालयस्तरावर सुरु आहे. अध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुरु असून वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत आणि संलग्नित रुग्णालय या संदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तसेच काही अध्यापकांची पदे कंत्राटी, मानधनावर भरण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

त्रुटी दर्शविलेल्या प्रस्तावित ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे शासनामार्फत अपील दाखल करण्यात येणार आहे. या अपिलाच्या सुनावणीस शासनाकडून त्रुटी पूर्ततेसंदर्भातील हमीपत्र सादर करुन या महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने योग्य ते प्रयत्न करण्यात येत आहेत.

सध्या नीट-यूजी-२०२४ ची परीक्षा पुढे गेली असल्यामुळे सदर ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी प्राप्त करुन घेऊन या शैक्षणिक वर्षी एमबीबीएस प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न सुरु आहेत, अशी माहिती मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिली आहे.

# कौठाळी येथे कृषीदूतांनी केले बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक

उत्तर सोलापूर/प्रतिनिधीः कौठाळी येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना जैविक आणि रासायनिक बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यावेळी बीज प्रक्रिया संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. बियाण्यांच्या खरेदीमधून शेतकऱ्यांची अनेकदा फसवणूक होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया वरदान ठरते.यावेळी कृषिदूत ओंकार गायकवाड, तुषार जगताप, केशव जगदाळे, सचिन मारकड ,अजिज काझी,वरूण घाळी, दिपक नामदे, यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. यावेळी प्राचार्य.डॉ.अमोल शिंदे, कार्यक्रमाधिकारी प्रा.संतोष शेंडे, विषयतज्ञ प्रा.किरण माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# प्रशासक तथा आयुक्त डॉ.अझीझ शेख यांची महापालिका क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी भेट



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उल्हासनगर/बाळासाहेबअहिरे : महापालिका प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांनी आज दिनांक ०९/०७/२०२४ महापालिका क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी भेट दिली. त्यामध्ये प्रथम प्रभाग समिती क्र.३ मध्ये पाहणी करीत असताना माहिती अधिकार, पी.जी. पोर्टल, आपले सरकार यांचे किती अर्ज आले, किती अर्जाचा निपटारा केला.. सदर प्रभाग समिती क्षेत्रातील अतिक्रमण, आरोग्य, अनधिकृत बांधकाम इत्यादी विषयांबाबत काय परिस्थिती आहे, याचा आढावा घेतला. तसेच त्याठिकाणच्या कामाची पाहणी करून संबंधित प्रभाग अधिक कर्मचारी यांना योग्य ते निर्देश दिले.त्यानंतर व्ही.टी.सी., उल्हासनगर- ४ येथील मा. हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडासंकुलाची पाहणी केली व तेथील कामगारांची संख्या वाढविणे, कामाला गती देणे, देनंदिन कामावर देखरखीसाठी सुपरवायझर उपस्थित ठेवणे, याबाबत निर्देश दिले तसेच काही ठिकाणी साफसफाईच्या कामाची सुध्दा पाहणी केली.

तसेच हवामान खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार रेड अ‍ॅलर्ट जारी केला असल्याने म्हणून हिरा घाट येथील मुख्य नाल्याची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला व सदर ठिकानी परिस्थिती समाधानकारक असल्याची खात्री केली.

# विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मिटण्यासाठी १३२ के. व्ही, सब स्टेशन उभारण्यासाठी मकाईची जमीन उपलब्ध करून देणार : दिग्विजय बागल





**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मिटवण्यासाठी १३२ के, व्ही, सब स्टेशन उभारण्यासाठी मकाई जमीन उपलब्ध करून देणार पश्र्चिम भागातील शेतकऱ्यांसाठी दिग्विजय बागल यांचा पुढाकार

विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मिटवण्यासाठी १२२ केवी सब स्टेशन उभारण्यासाठी जमीन उपलब्ध करून देणार करमाळा तालुक्यातील पश्र्चिम भागातील विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी या भागात १३२ केवी सब स्टेशन उभारण्याची करणे गरजेचे असून यासाठी मकाई सहकारी साखर कारखान्याच्या मालकी हक्काची जमीन देण्यात येईल अशी ग्वाही मकाई कारखान्याचे मा चेअरमन दिग्विजय बागल यांनी कावळवाडी येथे कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना दिली

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शेजाळ होते करमाळा तालुक्यातील कावळवाडी येथील रश्मी बागल व दिग्विजय बागल यांच्याशी प्रेम करणाऱ्या ग्रामस्थांनी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते मोरवड केम वांगी नंबर तीन वीट वडगाव उत्तर केतुर नंबर दोन वर कटणी येथील मेळाव्यानंतर हा आठवा मेळावा होता यावेळी बागल यांनी बोलताना सांगितले की उजनी धरणात बोरसे पाणीसाठा असतानाही रात्र कावळवाडी जिंती रामवाडी भिलारवाडी या भागातील शेतकऱ्यांना दरवर्षी उन्हाळ्यात पिके जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो त्यामुळे या परिसरात उन्हाळ्यात पुरेसा पाणीसाठा राहिला अशा पातळीवर बुडीत बंधारा झाल्यास येथील

हाय मस्त दिवे स्ट्रीट लाईट बस स्थानक शेड वाकडी पेपर ब्लॉक समाज मंदिर तसेच शासनाकडून नियमित मिळणारा शासकीय कार्यालय व शाळा खोल्यासाठी चा निधी अशी कामे झाली की विकास झाला अशी विकासाची संख्या येतील मागील दहा वर्षातून लोकप्रतिनिधींनी करून ठेवले आहे औद्योगिक वसाहत सिंचनाचे प्रश्र्न मजबूत रस्ते लोकसंख्या वाढल्याने त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती क्रीडा संकुल शासकीय जलतरण तलाव तालुक्याचे क्षेत्रफळ व लोकसंख्या जास्त असल्याने नवीन पोलीस ठाणे कुर्डूवाडी येथे राज्य राखीव गटाचे प्रशिक्षण केंद्र जेऊर येथे स्टेशन येथे म** धक्का केम येथे ग्रामीण रुग्णालय पारेवाडी येथे महावितरण चा नवीन उपविभाग दीक्षा परिसरात बुडीत बंधारा उजनी जलाशय फुल रेटेवाडी उपसा सिंचन योजना के मुळशीने उपसा सिंचन योजना पांढरेवाडी उपसा सिंचन योजना पूर्व भागातील सेनापोरगळ धरणग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमीन वाटप होणे अशी कामे होणे आवश्यक आहेत या प्रश्र्न या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वेळ मागितली असून अधिवेशन समता करमाळा तालुक्यातील प्रश्र्नासाठी बैठक लावण्याची आश्र्वासन दिले आहे

शेतकऱ्यांना कायदेशीर होणार आहे याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे पुढील आठवड्यात पाटबंधारे विभागाकडून स्थळ पाणी करून शासनाचा अहवाल सादर केला जाणार आहे असे बगल यांनी बोलताना सांगितले

यावेळी मखाई कारखान्याची चेअरमन दिनेश भांडवलकर ज्येष्ठ नेते संचालक बाळासाहेब पांढरे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप मकाईची संचालक राजाभाऊ हाके सतीश शिंदे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक काशिनाथ काकडे आजिनाथ काटमोडे आजिनाथ झांजुर्णे विलास काटे दत्ता गायकवाड रेवणात निघत गणेश जवळ दत्तात्रय तिनीचे रामदास के नीचे दिवेगव्हाणचे सरपंच हनुमान पाटील स्वप्नील गोडगे रणजीत शिंदे पप्पू गुळवे व पंचकोशीतील ग्रामस्थ महिला या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारंपारीक वस्त्रोद्योग बक्षिस योजनेसाठी हातमाग विणकरांनी १९ जुलै पर्यंत अर्ज करावेत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी व वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांना हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक १० नोव्हेंबर २०२३ नुसार पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी एकात्मिक व शाश्र्वत वस्त्रोद्योग, धोरण २०२३-२८ असे असून, सन २०२३-२४ करीता या पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांना बक्षीस योजना अंतर्गत विणकरांना बक्षिस देण्यात येणार आहे. या योजनेतर्गत विजेत्या स्पर्धकांचे राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त सत्कार करण्यात येणार आहेत. शासन निर्णयात राज्यातील पारंपारीक वस्त्रोद्योग विणरांचा सन्मान करण्यासाठी आणि सामाजिक व आर्थिक या क्षेत्राच्या योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी, पारंपारीक वस्त्रोद्योग विणकारांना ही बक्षीस योजना देण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत पाच पारंपारिक पैठणी साडी , हिमरु शाल , करवत काटी साडी, घोंगडी , खण फॅब्रिक ह्या वस्त्रोद्योग क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट डिझाईन्सचा राष्ट्रीय हातमाग दिननिमित सत्कार करण्यात येणार असून पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाला अनुक्रमे रु. २० हजार , रु. १५ हजार आणि रु. १० हजार बक्षिस देण्यात येणार आहे. सदर बक्षिसाची रक्कम पारंपारीक वस्त्रोद्योग विणकरांच्या बँक खात्यामध्ये डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येणार आहे. या योजनेचे निकष खालील प्रमाणे राहतील पारंपरिक वस्त्राचे विणकाम करणारे सर्व विणकर, खाजगी/सहकारी संस्था/ महामंडळ/महासंघाचे/स्वयंसेवी संस्था/गट या स्पर्धेत भाग घेवू शकतील. अर्जासोबत विणकाम करतानाचा विणकराचा जिओ टॅगींग फोटो सादर करणे गरजेचे राहील.आणि तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तरी या पारंपारीक वस्त्रोद्योग बक्षिस योजने अंतर्गतचे हातमाग विणकरांना त्यांचेकडील उत्कृष्ट वाण उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापूर कार्यालय पत्ता महसूल कर्मचारी सहकारी संस्था इमारत, जुने जिल्हाधिकारी, सोलापूर आवार, सोलापूर येथे दि. १९ जुलै २०२४ पर्यंत सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत. तसेच या विभागतील जास्तीत जास्त विणकर, खाजगी/सहकारी संस्था/ महामंडळ/महासंघाचे/स्वयंसेवी संस्था/गट यांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन वस्त्रोद्योगचे प्रादेशिक उपायुक्त चंद्रकांत टिकुळे यांनी केले आहे.

# मेंढपाळ बांधव आपल्या शेळ्या मेंढ्या सहित पंढरपूरला निघाले



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढा/प्रतिनिधीः धनगर समाजाच्या वतीने आषाढी एकादशी दिवशी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालण्याचे आंदोलन जाहीर केले असून यासाठी समाजातील विविध कार्यकर्ते मेंढपाळ बांधवांच्या भेटीगाठी घेऊन पंढरपूरच्या दिशेने आगे कूच करा असे आव्हान करीत आहेत यासाठी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळनवर व प्रदेश सदस्या विश्रांती ताई भुसनर यांनी आज मंगळवेढा येथे मेंढपाळ बांधवांना भेटून आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी पंढरपूरला या असे निमंत्रण दिले या आंदोलनातील प्रमुख मागणी असे आहे अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धरतीवर धनगर समाजातील तरुणांना बिनव्याजी कर्ज मिळावे पंढरपूर शहरांमध्ये अहिल्याभवन उभे करून समाजातील भाविकांना याचा लाभ व्हावा व एसटी आरक्षणाची अंमलबजावणी त्वरित करावी अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील जाचकाठी रद्द करून ही योजना त्वरित सुरू करावे मुख्यमंत्री महोदयांनी पंढरपूरला येण्याअगोदर या योजना मान्य करूनच विठ्ठलाचे महापूजा करावी अन्यथा आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे दोन वाजता सर्व मेंढपाळ बांधव आपल्या शेळ्या मेंढ्या बिराडा सहित विठ्ठलाला प्रदक्षणा घालणार आहेत असे आव्हान सरकारला करण्यात आले आहे

# जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयांनी त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-१ ऑनलाईन ३१ जुलै पर्यंत सादर करावे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासनाच्या ध्येय धोरणानुसार ,सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचीत करणेची सक्ती करणारा) कायदा १९५९ व त्याखालील नियमावली १९६० मधील कलम ५(१) (शासकीय आस्थापनांसाठी), ५(२)(खाजगी आस्थापनांसाठी) नुसार, सोलापूर जिल्ह्यातील सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी त्यांचेकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती पुरुष/स्त्री/एकूण (त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-१) स्थानिक सेवायोजन कार्यालयास ऑनलाईन सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे.

या सेवायोजन क्षेत्र माहितीचा उपयोग हा योजनाबध्द आर्थिक विकासात निरनिराळे प्रकल्प तयार करण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक मनुष्यबळाचा अंदाज घेण्यासाठी होत असतो. अशा प्रकारची प्राप्त होणारी सांख्यिकी माहिती महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कडे दर तिमाहीस पाठविली जाते.तरी सदर विविरणपत्र(ई-आर १) ३१ जुलै पर्यंत ऑनलाईन खाली दिलेल्या वेबपोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. या वेबपोर्टलवर त्रैमासिक विवरणपत्र ई.आर-१ हे प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ऑनलाईन सादर करण्यासाठी प्रत्येक आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड हे यापूर्वीच दिलेले आहेत त्याचा वापर करून भरण्यात यावा. वेबसाईट -https://roigar.mahaswayam.gov.in यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्कचौक, सोलापुर (०२१७-२९५०९५६) या कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास ,रोजगार व उद्योजकता सोलापूर श्री नलावडे यांनी केले आहे.


# सोलापुरातील त्या पोलीस आयुक्तांवर जबर कारवाई करा



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर येथील पोलीस आयुक्त विजय कबाडे यांना निलंबित करून त्यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना शिंदे गटाच्या वतीने पोलीस आयुक्त यमराज कुमार यांना देण्यात आली शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजी यांच्यावर सतत खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत कपडे यांनी कुठल्याही प्रकारची शहेनशहा न करता काळजी यांच्यावर सलग तीन गुन्हे सादर केले आहेत दरम्यान दोन पुण्यामध्ये पोलीस चौकशी करण्यात आली सबळ पुरावे न मिळाल्यामुळे हे गुन्हे मागे घेण्यात आले एकूणच काळजी यांच्यावर जाणीवपूर्वक गुन्हे दाखल केले जात आहेत या प्रकरणाची उच्चत्तरीय चौकशी करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे या निवेदना वर जिल्हाप्रमुख शशिकांत ठोंबरे पाटील शहरप्रमुख मनोज शेजवळ व सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश नाना साठे सतीश सपकाळ संजय देशमुख नंदकुमार मोरे सीमा मोरे कल्पना स्वामी मुक्ती खंदारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

# आषाढी यात्रेनिमित्त अन्न व औषध प्रशासनाचे पंढरपूर येथे करडी नजर




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर येथे आषाढी यात्रा संपन्न होत असलेल्या आषाढी यात्रा निमित्त अन्न व औषध प्रशासन सोलापूर विभागाचे आतापर्यंत आस्थापनाच्या तपासण्या करून दूध उद्योगधजन्य पदार्थांच्या विशेषता बासुंदी दूध तसेच उपवासाचे पदार्थ साबुदाणा, भगर, बटाटा चिवडा, शाबू चिवडा इत्यादी अन्नपदार्थाचे नमुने विश्र्लेषणासाठी घेण्यात आलेले आहेत सदर सर्व नमुने विश्र्लेषणासाठी अन्न विश्र्लेषणाकडे यांच्याकडे पाठवण्याचे कामकाज चालू आहे तसेच आषाढी वारी निमित्त पंढरपूर येथील मठ आश्रम शाळा यांच्या तपासण्या करून सदर ठिकाणी येणाऱ्या वारकऱ्यांना भगर या अन्नपदार्थ बाबत घ्यावयाचे काळजीबाबत सूचना ही सर्व मठांना देण्यात आलेले आहेत तसेच पंढरपूर शहरातील,, किराणा, दूध, दुग्धजन्य पदार्थ उत्पादक व विक्रेते तसेच हॉटेल आस्थापनाची बैठक घेऊन त्यांना नागरिकांना व भाविकांना स्वच्छ निर्मळ ताजे अन्न व उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत सोलापूर जिल्ह्यातील अन्नसुरक्षा अधिकारी तसेच पुणे विभागातील अन्नसुरक्षा अधिकारी यांचे पथक यापुढे ही पंढरपूर येथे कार्यरत असणार आहेत सदरची कार्यवाही अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त अन्न व श्री सुनील जिंतूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अन्न सुरक्षा अधिकारी श्री उमेश भिसे श्रीमती नंदिनी हिरेमठ श्रीमती रेणुका पाटील श्रीमती अस्मिता टोणपे व नमुना सहाय्यक श्रीशैल्य रिटर्नली यांच्या पथकाने पूर्ण केलेली आहे

# गणेश धुमाळ यांना पीएच.डी.प्रदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः तालुक्यातील कौठळी गावचे सुपुत्र गणेश संभाजी धुमाळ यांना पुणे येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांचा संशोधनाचा विषय 'परफॉर्मन्स इन्वेस्टीगेशन ऑफ डबल पाइप हीट एक्सचेंजर युसिंग ट्विस्टेड टेप इन्सर्टस इन साईड अँड आऊट साईड पाईप सरफेसेस'असा होता. ह्याचा वापर कार्यक्षमता प्रीडिक्शन,बॉयलर,रिन्यूएबल एनर्जी सिस्टिम,वेस्ट हीट रिकव्हरी यामध्ये होऊ शकतो.

गणेश धुमाळ यांनी पीएच.डी. दरम्यान, उच्च मानांकित आंतरराष्ट्रीय एल्सेव्हियर जर्नल्समध्ये तीन शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. तसेच त्यांनी दोन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले. यासाठी त्यांना प्रा.डॉ.संजय एन.हावलदार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.गणेश धुमाळ यांना त्यांच्या उल्लेखनीय यशासाठी कुलगुरू डॉ. रविकुमार एम.चिटणीस यांनी विद्यापीठातर्फे सत्कार करुन अभिनंदन केले. तसेच अध्यक्ष डॉ. विश्र्वनाथ कराड,राहुल कराड, डॉ.दिनेश शेठ, डॉ. शिवप्रकाश बर्वे, डॉ.मूर्ती चावली, डॉ.कृष्णा वऱ्हाडे यांचे सहकार्य लाभले. डॉ.गणेश धुमाळ हे मल्टिनॅशनल कंपनीमध्ये डेटा सायंटिस्ट पदावर



काम करत आहेत. त्यांच्या यशासाठी हार्दिक अभिनंदन!

# स्वेरीच्या प्रा.बी.डी. गायकवाड व प्रा. एस.एम. खोमणे यांच्या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता

## ‘कन्वेअर चेन लिंक मॅन्युफॅक्चरिंग’ यावर केले संशोधन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाअंतर्गत असलेल्या वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर धोंडी गायकवाड व प्रा. सचिन महादेव खोमणे यांच्या पेटेंटला भारत सरकारकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे.

‘स्पेशल पर्पज टूल बाय कंबायनींग टू कटिंग ऑपरेशन इन अ सिंगल स्ट्रोक ऑफ प्रेस मशीन टू मॅन्युफॅक्चरिंग कन्वेअर लिंक’ या विषयावर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड व प्रा. सचिन खोमणे यांनी या शोध पेटंटची निर्मिती केली आहे. साखर कारखान्यातील अवजड मशीन्समध्ये असलेल्या ‘कन्वेअर चेन लिंक मॅन्युफॅक्चरिंग’साठी याचा उपयोग होतो. स्वेरीचे प्रा.बी.डी. गायकवाड व प्रा. सचिन खोमणे यांच्या या पेटंटला भारत सरकार कडुन मान्यता मिळाल्याबद्धल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.




यावेळी सर्व मान्यवर, अधिष्ठाता, विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. संशोधन विभागाच्या प्रगतीचे द्योतक असणाऱ्या या पेटंट मुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी वर्कशॉपचे इन्चार्ज प्रा.भास्कर गायकवाड व प्रा सचिन खोमणे यांचे अभिनंदन केले.

# चांदा येथील शनैश्वेर ग्रुप मधील तरुणांचा अनोखा उपक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी :अहमदनगर जिल्ह्यातील चांदा ता नेवासा येथील शनैश्र्वेर ग्रुप मधील तरुणांनी सामाजिक उपक्रम राबवून एक अनोखा संदेश दिला आहे. चांदा येथील बाळासाहेब वर्मा, बाळासाहेब (पंचवटी) जावळे,बाळासाहेब दहातोंडे मेंबर, ऋषभशेठ गांधी, अशोक हराळे,डॉ सुधाकर निकाळजे,जेष्ठ पत्रकार अरुणभाऊ सोनकर यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील कमीत कमी ३५ तरुण आज जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील धार्मिक देवस्थान मध्ये जाऊन सेवा करत आहेत. यामध्ये आतापर्यंत श्री क्षेत्र देवगड श्री क्षेत्र कालभैरवनाथ देवस्थान आगडगांव तसेच प्रत्येक अमावास्या ला श्री क्षेत्र मढी येथे सेवा देत आहेत या सेवेमध्ये मंदिरात दर्शन बारीला जे भाविक असतात त्यांना व्यवस्थित दर्शन करण्यास मदत करणे, मंदिराच्या प्रांगणात काही कचरा असल्यास स्वच्छता करणे तसेच मंदिरात आवारातील पार्किंग मध्ये जे भाविक अस्ताव्यस्त आपल्या गाड्या लावतात त्यांना व्यवस्थित व नम्रपणे समजावून सांगणे अशा प्रकारची सेवा सुरू आहे आणि हि सेवा बघुन शनैश्र्वेर ग्रुप ला श्री क्षेत्र पंढरपूर तसेच कोल्हापूर ची महालक्ष्मी मंदिर येथून संपर्क झालेला आहे. या सेवेतून एक मानसिक समाधान मिळते तसेच आपल्या थोडेसे पुण्य मिळेल या हेतूने हे तरुण सेवा करत आहे कारण जी सेवा केली जाते ती पुर्णपणे निशुल्क असुन कुठलाही मोबदला घेत जात नाही. या सेवेसाठी चंद्रकांत जावळे चेअरमन,संभाजीशेठ दहातोंडे, बाबासाहेब भालके, निरजभाई मनोचा, योगेश जावळे, संतोष तुपे सोमनाथ धुमाळ, हभप दादा गवळी, गणेश दहातोंडे, अशोक दहातोंडे, सोमनाथ दहातोंडे, शशीकांत कर्डिले, निरजभाई मनोचा, बंडुभाऊ दहातोंडे,अशोक दहातोंडे, संदिप नागपुरे, लक्ष्मण दहातोंडे, विजय भगत, कैलासराव केंकाण, शिवाजी दहातोंडे, संतोष जावळे, कमलेश शेवाळे देवा यांचा सहभाग आहे.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचा निधी लवकरच मिळणार

## धनगर समाजाच्या प्रश्नासाठी भाई नितीन काळे यांचा मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः बहुजन कल्याण विभागाच्या सचिवांना पुढील कार्यवाहीच्या सूचना

पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अंतर्गत भटक्या जमाती क वर्ग धनगर समाज बांधवांसाठी घरकुल प्रस्तावात त कार्य तत्पर मंजुरी व निधी वितरण करण्याबाबत भाजप युवा मोर्चा प्रदेश सचिव भाई नितीन काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठपुरावा करीत लेखी पत्र दिले आहे यावर देताच तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतः सही करून सचिव व इतर मागास बहुजन कल्याण त्यांना आदेश दिले आहेत त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचा निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे

सोलापूर जिल्ह्यातील गोरगरीब धनगर समाजाचा हा निवाऱ्याचा प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी नितीन काळे यांनी पावसाळी अधिवेशन चालू असताना सतत पाठपुरावा सुरू केला व दिनांक ७/३/२०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यातील समितीचे बैठक झाली होती त्या भटक्या जमाती व धनगर प्रवर्गातील १७८६ प्राप्त लाभार्थींची शिफारस करण्याबाबत समितीने निर्णय घेतला होता वरिष्ठ स्तरावर याबाबत अध्याप निर्णय झाला नाही की बाब नितीन काळे यांच्या लक्षात आले असता त्यांनी तात्काळ मुख्यमंत्री यांची भेट घेतली व निधी मिळवण्याचा मार्ग सुकर झाला आहे त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार यांना देखील याबाबत सविस्तर माहिती दिली आहे त्यांनीही सकारात्मक भूमिका दाखवल्याने येणाऱ्या सर्व दिवसात निधीचा प्रश्र्न मार्गी लागेल असेच दिसत आहे याबाबत नितीन काळे यांनी समाज बांधवांच्या वतीने आभार मानले आहे जात आहे नितीन काळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की हा पाठपुरावा करून लवकरच निधी मिळत मिळेल व सरकार सकारात्मक आहे त्यामुळे धनगर समाजातील बांधवांना लवकर राहण्यासाठी निवारा मिळेल असेच वाटत आहे



# नळदुर्ग जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी राणी धनराज वाघमारे यांची निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग ता तुळजापूर या शाळेची शालेय व्यवस्थापन समिति निवड करण्यात आली . जिल्हा परिषद कन्या प्रशाला मध्ये पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पालका मधून एकमताने व्यवस्थापन समिती सदस्य निवडण्यात आली ही समिती आजतागायत कधीच निवडणूक घेतलेली नव्हती परंतू लोकशाही पद्धतीने शांत पणे मतदान करून शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली यात अध्यक्ष पदाची माळ सामाजिक कार्यकर्त्या राणी धनराज वाघमारे यांच्या गळ्यात पडली . या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ३ पालक महिला उभ्या होत्या त्यामध्ये राणीला ९ मतदान मिळाले मिराला वाघमारे यांना ५ मते अंजनाला २ मते आसे मतदान झाले यामध्ये राणी धनराज वाघमारे ह्या विजयी झाल्या




उपाध्यक्षपदी संजय राठोड यांची बिनविरोध निवड आली तर तज्ज्ञ शिक्षक मार्गदर्शक म्हणून अड प्रा डा पाहुरंग पोळे निवड करण्यात आली तर सदस्य म्हणून अंजना चव्हाण ,मिरा वाघमारे,ज्योती माने,जोत्सना बनसोडे , चंद्रकला राजगुरु, नवनाथ काळे ,गोविंद राठोड,अल्ताफ बेग , सुवर्णा बागडे ,कु प्राजक्ता होंडराव यांची निवड करण्यात आली कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नळदुर्ग डव्लींश चे संपादक पत्रकार दादासाहेब बनसोडे हे होते तर आसुन प्रतिनिधी म्हणून मिलींद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. प्रा डॉ पांडुरंग पोळे व पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी आलेल्या पालकाना मार्गदर्शन केले ही संपूर्ण प्रक्रिया शाळेचे मुख्याध्यापक तथा व्यवस्थापकीय सचिव कमलाकर गायकवाड यांनी खेळी मेळीच्या वातावरणात पार पाडली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले यासाठी केंद्रप्रमुख सत्तेश्र्वर जाधव, सर्व शिक्षक व काही पालक या मेळाव्याला उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण महिला यांच्या वतीने ग्रामीण भागातील महिलांकरिता शासकीय योजना जनजागृती मोहीमेचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर – खर्डी/विजय घनघाव : शहापूर – ठाणे जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे शहापूर तालुक्यातील खर्डी येथे महिलांकरिता शासकीय योजना जनजागृती मोहीम सौ. कल्पना तारमळे (महिला जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, ठाणे जिल्हा ग्रामीण ) यांच्या माध्यमातून राबविण्यात आली.. यावेळी महाराष्ट्र सरकार (महायुती सरकार )तर्फे महिलांकरिता ज्या काही योजना जाहीर केल्या आहेत त्यांची सविस्तर माहिती यावेळी सादर करण्यात आली. यात प्रामुख्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना उच्चं शिक्षण मोफत योजना, ड. ढ. बस तिकीट मध्ये ५०% सवलत, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्ट अप योजना, लघु उद्योजक महिलांसाठी, बचत गट महिलांसाठी लखपती दीदी, पिंक रिक्षा योजना, आणि आईचं नाव संपूर्ण नांव नमूद करताना घेण्यात यावं.. तसेच महिलांना सॅनिटरी पॅड चे वाटप यावेळेस करण्यात आले... राज्यातील महिलांच्या सेवेसाठी, त्यांना सर्व दृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र सरकार खंबीर आहे, असं आश्र्वासन ठाणे ग्रामीण महिला जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सौ. कल्पना तारमळे यांनी दिलं आहे.* खर्डी परिसरातील अंगणवाडी सेविका, बचतगट महिला वर्ग, आणि इतर महिला वर्ग, सौ. तसलीम कोतवाल, अंगणवाडी सेविकास सौ नमिता कांबळे , सौ स्वाती बागुल आदी उपस्थित होते .. महाराष्ट्र राज्य महिला बालविकास मंत्री ना. आदितीताई तटकरे आणि प्रदेश महिला अध्यक्ष तथा राज्य महिला आयोग अध्यक्ष सौ. रूपालीताई चाकणकर यांच्या बहुमोल सहकार्य आणि मार्गदर्शनाने ठाणे जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण भागामधील महिलांकरिता अशा प्रकारे जनजागृती मोहीम पूर्णपणे राबवून महिलांकरिता विशेष जनजागृती करणार आहोत असं तारमळे यांनी म्हटलं आहे.



# नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक वतीने प्रियदर्शनी आश्रम शाळा उस्थळे येथील विद्यार्थ्यांना पावसाळी साहित्य वाटप




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिकः जिथे कमी तिथे आम्ही या तत्त्वावर चालणाऱ्या नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक यांच्याकडून प्रियदर्शनी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा उस्थळे येथील विद्यार्थ्यांना पावसाळी साहित्य वाटप.. नमस्ते नाशिक फाउंडेशन संस्थेतर्फे गुरुकृपा आदिवासी शिक्षण मंडळ पेठ यांच्या प्रियदर्शनी आदिवासी प्राथमिक व माध्यमिक शाळा उस्थळे तालुका पेठ येथे विद्यार्थ्यांना पावसाळी साहित्याचे वाटप करण्यात आले त्यामध्ये रेनकोट, छत्री, अशा विविध प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. शाळेतील ५७६ विद्यार्थ्यांना नमस्ते नाशिक फाउंडेशन संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव, प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉक्टर राहुल बाविस्कर, यांच्या हस्ते मुलांना साहित्याचे वाटप करण्यात आले याप्रसंगी शाळेच्या परिसरात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आली व शाळेच्या विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे आदिवासी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, कार्यक्रमाप्रसंगी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या असिस्टंट मॅनेजर सायली गाळणकर, प्रसिद्ध दंत रोग तज्ञ डॉक्टर विशाल गाळणकर महाराष्ट्र हास्य योगा क्लबचे अध्यक्ष सुनील कोटकी, लक्ष्मीकांत विसावे,सुनंदा दसपुते, सरला मुसळे, मीनाक्षी नागपुरे,वैशाली पाटकर श्री इंटरप्राईजेस च्या संचालिका मोनाली अमृतकर,, गुरुकृपा आदिवासी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विठोबा भोये, सदस्य दिनकर भोये, मुख्याध्यापक प्राथमिकचे खंडेराव जगदाळे व माध्यमिकचे आर जी पाटील पोलीस पाटील देविदास भोये आदी मान्यवर उपस्थीत होते. कार्यक्रम पार पाडण्यासाठी श्री व्ही वी शेवाळे, आर एम महाजन, आर एम बुवा, ए बी घुगे, एम के चौरे, एस डी डांबरे ,श्रीमती वनश्री भोये, श्री मदन महाले, अशोक पवार आधी शिक्षक वृंदांनी विशेष परिश्रम घेतले. श्रीयुत विठोबा भोये यांनी मनोगत व्यक्त करताना नमस्ते नाशिक फाउंडेशन या संस्थेचे आभार मानले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी नमस्ते नाशिक फाउंडेशन चे श्रीयुत संदीप देव यांचे मोलाचे सहकार्य लाभले .तसेच सूत्रसंचालन पी एस पाटील यांनी केले.




# कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिदगाव : प्रशालेत दहावी व बारावी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशाले तर्फे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री परमहंस शिक्षण संस्थेचे सचिव श्री बी ए बिराजदार साहेब प्रशालेचे मुख्याध्यापक श्री महेश हरके सर श्री परमहंस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री देवराज बिराजदार सर व प्रमुख पाहुणे पालक प्रतिनिधी श्री डॉक्टर बसवराज व्हनाळे श्री संतोष पोतदार श्री बालाजी गरजे यांच्या उपस्थितीत श्री बी ए बिराजदार साहेब यांच्या हस्ते दहावीतून प्रथम द्वितीय तृतीय आलेली विद्यार्थि शुभम व्हनाळे धनेश्र्वरी पाटील घोरपडे अनुराधा पोतदार संम्नती बारावीतून प्रथम द्वितीय तृतीय विद्यार्थिनी कुमारी बिराजदार धानम्मा कुमारी सुजाता मुगळे कुमारी अस्मिता म्हमाणे या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले तसेच प्रशालेतील शिक्षक श्री गोपाळ गेडाम सर यांचे कॉम्प्टिटेटिव्ह एक्झाम च्या अभ्यासक मंडळावर निवड झाल्याबद्दल त्यांचेही सत्कार करण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रास्ताविक आभार सांस्कृतिक विभागप्रमुख श्री गोपाळ गेडाम सर श्री चंद्रकांत बिराजदार सर यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालक शंकर हुळमजगे आनंदराज बिराजदार व शिक्षक सौरभ उटगे महेश खंडाळकर व्यंकट बिराजदार प्रवीण स्वामी प्रा सुरेश जाधव प्रा महादेव बिराजदार अविनाश दुनगे प्रवीण स्वामी गणेश जोजन अप्पू मुदकण्णा पार्वती जगताप कालिंदी भाले प्रदीप शिंदे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते.